# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचेकार्यालय
रामनगरसुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्रमांक - ११४/२०२५ दिनांक १०/०३/२०२५

## प्रेसनोट

## ०३ महिन्याच्या बालकाचे अपहरण करणाऱ्या आरोपी महिलेस जि. नालंदा, बिहार राज्यातुन अटक करुन तिच्या ताब्यातून ०३ महिन्याच्या बालकाची सुखरुप सुटका - मांडवी पोलीस ठाणेची कामगिरी

--------------ooo---------------

दिनांक १८/०२/२०२५ रोजीचे दुपारी ०२.०० वा. चे सुमारास फिर्यादी नबीउल्लाह हमीदउल्लाह चौधरी, वय-३८ वर्षे, रा. नालेश्वरनगर, प्राप्ती हॉटेलच्या जवळ, ता.वसई जि, पालघर यांचा ०३ महिन्याचा मुलास फिर्यादी यांच्या मेव्हण्याची पत्नी नामे किताबुनिशा हिने खेळवण्यासाठी बाहेर घेवुन जाते असे सांगुन फिर्यादीचे कायदेशीर रखवालीतून पळवुन नेले होते. सदर बाबत मांडवी पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. ४२/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम १३७(२) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयातील आरोपी महिलेने आईच्या अंगावरील दुध पित असलेल्या ०३ महिन्यांच्या लहान बालकाचे अपहरण केले असल्याने गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून तपास अधिकारी सपोनि/मुसळे व गुन्हे प्रकटीकरण पथकातील सपोनि/सावंत यांनी मा. वरिष्ठांच्या मार्गदर्शनानुसार तपास सुरु केला. सदर पोलीस पथकाने कौशल्यपुर्ण तपास करुन सदर महिला आरोपीत ही सरमेरा, जि. नालंदा रा. बिहार या परिसरात असल्याचे निष्पन्न झाले. प्राप्त माहितीचे आधारे तपास अधिकारी सपोनि/मुसळे व पथक बिहार राज्य येथे तपासकामी गेले. नालंदा पोलीस घटकातील तांत्रिक विश्लेषण टिम (डी.आय.यु.युनिट) यांच्या मदतीने महिला आरोपी व ०३ महिन्याचे अपहरण झालेले बाळ असण्याची शक्यता असलेल्या जागेचा भौगोलीक व तांत्रीक अभ्यास करुन मध्यरात्री मांडवी पोलीस पथक, नालंदा डीआययु टिम व स्थानिक पोलीस ठाणे यांच्या मदतीने बिहार-झारखंड सीमावर्ती दुर्गम भागातील ग्राम सुर्यचक, मिरनगर, सरमेरा गावातील अनेक घरांत व ईसमांकडे तपास करुन सदर महिला आरोपीचा शोध घेतला. सदर आरोपीत महिला हिस ताब्यात घेवून तीचे ताब्यातून अपहरण झालेल्या ०३ महिन्याच्या लहान बाळाला सुखरुप सोडवून सदरचा गून्हा उघडकीस आणण्यात यश मिळविले.

महिला आरोपीत हिस जि. नालंदा, राज्य-बिहार येथून मांडवी पोलीस ठाणे येथे आणून तीस अटक करण्यात आली आहे. आरोपीत हिचेकडेस केलेल्या तपासात आरोपीत महिला हिचे लग्न झालेले असून तीला तीन अपत्य आहेत. आरोपीत महिलेचे सरमेरा, जि.नालंदा रा.बिहार येथील एका पुरुषासोबत प्रेम संबंध होते. आरोपीत महिलेला तीच्या प्रियकरासोबत नव्याने संसार करावयाचा होता म्हणून तीने लग्न झाल्याची व तीन अपत्याची माहिती प्रियकरास सांगीतली नव्हती. आरोपीत महिलेने प्रेम संबंधातून ती तीचे प्रियकरापासून गरोदर असल्याची खोटी माहिती प्रियकरास फोनद्धारे कळवित असायची. आरोपीत महिलेच्या नणंदेचे ३ महिन्यांचे बालक हे तीचे व

तीच्या प्रियकराचेच असल्याचे प्रियकरास व्हिडीओ कॉलद्वारे भासवात असायची. आरोपीत हिला प्रियकरासोबत नव्याने संसार करण्याची इच्छा असल्याने सदर उद्देश साध्य करण्यासाठी तीच्या नणंदेच्या ०३ महिन्यांच्या लहान बालकाचे अपहरण करुन सदर बालकासह ती तीचे प्रियकराकडे नालंदा, राज्य बिहार येथे निघून गेलेली होती अशी हकीकत निष्पन्न झालेली आहे. पुढील तपास मांडवी पोलीस ठाण्याचे नेमणूकीतील सपोनि/बालाजी मुसळे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा. श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, मा. श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, मा. श्री. जयंत बजबळे, पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-०३ विरार, मा. श्री. बजरंग देसाई, सहाय्यक पोलीस आयुक्त, विरार विभाग, मा. श्री. संजय हजारे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मा. श्री. शरद सुर्वे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांचे मार्गदर्शनात मांडवी पोलीस ठाण्याचे सपोनि/बालाजी मुसळे, सपोनि/संदिप सावंत, पोहवा/राजेंद्र फड, पोहवा/नितीन गलांडे, पोशि/गजानन गरीबे, पोशि/विशाल भगत, पोशि/जगदिश नाणेकर, पोशि/अमोल साळुंखे, मपोशि/शितल बिराजदार यांनी केली आहे.

--------------- ००० ----------------